

सौ. श्वेता ठाकूर

**लहानपणीच आजी-आजोबा व मामा-मावशांकडून घडवीलेले चांगले संस्कार व ज्ञान दानाची आवड ह्या शिदोरीवर आपले कर्तृत्व घडवणाऱ्या व आपल्या ज्ञानाचा फायदा इतरांना करून देवून विज्ञान विषयक उपक्रमात नवीन बाल वैज्ञानीक घडवण्यासाठी प्रत्नशील असलेल्या व महाराष्ट्र शासनाकडून अनेक पुरस्कार मिळवणाऱ्या बीना भगवान नाईक (सौ. श्वेता दिलीप ठाकूर) हीची अशीच एक SUCCESS STORY )**

...बीना भगवान नाईक (सौ. श्वेता दिलीप ठाकूर) ह्यांचे बालपण त्यांच्या आजोळी अर्नाळा येथील आजोबा श्री.बाळकृष्ण सामंत ह्यांच्या घरी गेले. त्यामुळे घरातील शिस्त, देवधर्म दानधर्म, कुळाचार, परोपकार, आलेल्या अतिथींचे स्वागत व घरातील आजी व मामा-मावशांचे संस्कार तिच्या बाल मनावर घडले गेले.

बीना हीचे शालेय शिक्षण काशीदास घेलाभाई हायस्कूल, आगाशी व डॉ. दिनकर जगन्नाथ गाळवणकर विद्यामंदिर, अर्नाळा ह्या शिक्षण संस्थेत झाले. शालेय जीवनात एक हुशार व आदर्श विद्यार्थीनी म्हणून बीनाची ओळख होती. हिच गुणवत्ता तिने महाविद्यालयीन शिक्षणात पुढे चालू ठेवत National Merit, State open merit Scolarships मिळवून रुपारेल महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली व पदवी नंतर पॅथालॉजीचा डिप्लोमा पूर्ण करूनही आई व मावशांचे अनुकरण करीत ज्ञानदानाचे कार्य करायचे ठरविले व गांधी शिक्षण भवन, जुहू येथे बी.एड ह्या कॉलेजमधून सर्वप्रथम येण्याचा मान तिने पटकावला व शिक्षकी पेशा स्वीकारत आगाशी विरार अर्नाळा ह्या शिक्षण संस्थेत शिक्षिकेची नोकरी स्वीकारली. ज्ञानदानाचे कार्य चालू असतानाच तिचा श्री. दिलीप ठाकूर यांच्याशी विवाह झाला व ती कु. बीना भगवान नाईक ची सौ. श्वेता दिलीप ठाकूर झाली. जसं तिला आपल्या माहेरी सहकार्य व प्रेम मिळालं तसेच तिला तिच्या सासरीही प्रेम व सहकार्य मिळाल्यामुळे सतत काहीतरी सकारात्मक करीत रहाणाऱ्या बीनास (श्वेतास) विज्ञान विषयक उपक्रमांत काहीतरी विशेष करावे म्हणून तिने विज्ञानविषयक उपक्रमाची सुरुवात वसई विज्ञान मंडळातून केली. तिथे तिला सौ.कल्पना पाटील व श्री. मकूंद भिडे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. वसई तालुक्यातील अनेक शाळांतून डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानीक परीक्षेस बसणाऱ्या व सायन्स एक्झीबीशन मध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सौ. बीना उर्फ श्वेता ठाकूर ह्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ होत आहे व तिच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी ह्या स्पर्धा परिक्षेत प्राविण्य मिळविले आहे. विज्ञान विषयाची तिची आवड व त्यामध्ये नवीन नवीन प्रयोग घडविणाऱ्या तिच्या जिज्ञासू वृत्तीस महाराष्ट्र शासनाकडून व अनेक शैक्षणीक संस्थानकडून तिला पुरस्कार ही मिळालेले आहेत.

बीना भगवान नाईक (सौ. श्वेता दिलीप ठाकूर) ह्यांना मिळालेले पुरस्कार व मान सन्मान.

१. महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाकडून बालभारतीमध्ये विज्ञान विषयतज्ज्ञ म्हणून निवड झाली आहे. इयत्ता ६वी, ७वी व ९वीच्या विज्ञान पाठ्यपुस्तकांच्या लेखकांत तिचा समावेश आहे.

२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ (S.S.C. व H.S.C. Board Pune) तर्फे "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" अंतर्गत इयत्ता ९वीच्या दैनिक चाचणी प्रश्नपत्रिका निर्मितीसाठी तिची निवड झाली आहे.

३. State Resource Group of Science ची सदस्य म्हणून तिची निवड झाली आहे.

४. 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान- NCF 2005 व (अपूर्व विज्ञान मेळावा) ह्या प्रकल्पांसाठी पालघर जिल्हा समन्वयक म्हणून तिला काम करण्याची संधी मिळाली आहे.

५. इयत्ता १०वी साठी बनविलेल्या (Mentel's Laws of Inheritance) ह्या शैक्षणिक साधनाला जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळून राज्य प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

६. मुंबई महानगरपालिकेच्या Virtul Classroom मध्ये मार्गदर्शन तिने केले आहे.

७. ती सलग १२ वर्षे मुंबई विज्ञान अध्यापक मंडळाची ठाणे विभागाची सहकार्यवाह आहे व डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेचे Paper Setting Booklet & Question Bank Writing यांत तिचा सहभाग असतो.

८. तसेच Action Research Projets साठी फोनवरून मार्गदर्शन करण्यास राज्यस्तरीय तज्ज्ञ म्हणून ती काम करते.

९. वसई विज्ञान मंडळाच्या सर्व उपक्रमांत व प्रश्नपुस्तिका लेखनात तिचा सक्रीय सहभाग असतो.

१०. MKCL व TIFR च्या OER4-S(Open Education Resocrecs for Schools) ह्या वेबसाईटसाठी शैक्षणिक साहित्याचे लेखन तिने केले आहे.

११. वसई तालुका कला-क्रिडा महोत्सवात Online Quiz स्पर्धेच्या आयोजनात तिचा सक्रीय सहभाग असतो.

१२. नुकतेच भोपाळ येथे Carriculum Development Wokshop for Key resourec persons ह्या राष्ट्रीय क ार्यक्रमात तिने विज्ञान आणि गणितासाठी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व केले.

१३. तिच्या ह्या वैशिष्ट्यपूर्ण कामगीरी मुळे तिला पद्मश्री भाऊसाहेब वर्तक गुणवंत शिक्षण सेवक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले असून तिला ताराबाई वर्तक स्मृति पुरस्कार व यशवंतराव चव्हाण विचारमंच आदर्श शिक्षक पुरस्कार, प्राप्त झाले असून तिच्या शैक्षणिक लेखांना दोनदा राज्यस्तरावर बक्षिसे ही मिळालेली आहेत.

सदैव हसतमुख प्रसन्न, आणि अनेक मान सन्मान मिळविणाऱ्या आणि शैक्षणिक व विज्ञान क्षेत्रात मोलाची कामगीरी करणाऱ्या बीना भगवान नाईक (सौ. श्वेता दिलीप ठाकूर) ह्यांना त्यांच्या पुढील वाटचाली करिता ''गौड ब्राह्मण सभे'' तर्फे हार्दिक शुभेच्छा!

**- उमाकांत महाजन**